# 39. बिग बॉस

साहित्य :

4 फुगे.

4 पेन्सिली.

4 वहीचे कागद.

1 घड्याळ.

खेळाची तयारी :

हा खेळ किमान दोन आणि जास्तीत जास्त कितीही जणात खेळता येईल.

आता हा खेळ चौघेजण खेळत आहेत.

प्रत्येकाने 1 फुगा, 1 पेन्सिल आणि 1 कागद घ्या.

फुगा फुगवा.

एका हातात फुगा आणि एका हातात पेन्सिल घ्या.

चला खेळूया :

चौघांनी आपापल्या हातातले फुगे एकाचवेळी हवेत उडवायचे.

फुगा हवेत असतानाच कागदावर भराभर 1 ते 1000 पर्यंत अंक क्रमाने लिहायचे आहेत.

या खेळात एकच हात वापरायचा आहे. म्हणजे ज्या हाताने लिहिणार त्याच हाताने फुगा वर उडवत राहायचे आहे. दुसरा हात वापरायचा नाही.

5 मिनिटे झाल्यावर हातातली पेन्सिल खाली ठेवायची आहे.

फुगा वर हवेत उडवताना तुम्ही फुग्याला कोणत्या दिशेने आणि किती जोरात फटका मारता यातच या खेळातील कौशल्य लपलेले आहे.

.................................................

नियम :

- अंक 1 2 3 4 या क्रमानेच लिहिले पाहिजेत.
- अपूर्ण अंक लिहिल्यास गुण मिळणार नाहीत.
- 5 मिनिटे संपल्यावर किंवा बाद होण्याआधी खेळाडूने जी सर्वात मोठी संख्या लिहिली असेल, तितके त्याला गूण मिळतील.
- दोन अंक जर एकमेकांना चिकटले असतील तर त्या अंकांचे मार्क मिळणार नाहीत.
- कुठल्याही कारणाने दुसरा हात वापरल्यास खेळाडू बाद.
- फुगा हवेत नसताना लिहिल्यास खेळाडू बाद.
- फुगा जमिनीवर पडल्यास खेळाडू बाद.

....................................................

कोण जिंकेल :

ज्या खेळाडूला
सर्वाधिक गूण मिळतील
तो बिग बॉस.

..........................................................